POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२९९ ● मुंबई, शनिवार, ३१ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## एक बडा नेता सत्तेतून बाहेर पडणार?
### महाराष्ट्रात मोठा राजकीय भूकंप... केंद्रबिंदू दिल्लीत

**■पुणे। प्रतिनिधी :**

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा मोठा भूकंप होणार आहे. महाराष्ट्रात होणाऱ्या या राजकीय भूकंपाचा केंद्रबिंदू दिल्लीत आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीपासून दूर गेलेले महादेव जानकर आता नवीन घरोबा करणार आहेत. इंडिया आघाडीसोबत जानकर जाणार असल्याची माहिती आहे. मी सध्या महायुती, एनडीएसोबत नाही, असे सूचक विधान जानकर यांनी केले. त्यामुळे जानकर मोठा निर्णय घेण्याच्या तयारी असल्याचं स्पष्ट आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे सर्वेसर्वा महादेव जानकर आता महायुतीला रामराम करणार आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकीनंतर जानकर नाराज असल्याचं वारंवार पाहायला मिळाले.आतातर ते नवा घरोबा करण्याच्या तयारीत दिसत आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती कार्यक्रमाच्या निमित्ताने महादेव जानकर यांनी दिल्लीत शक्तीप्रदर्शनाची जोरदार तयारी चालवली आहे. या कार्यक्रमासाठी राहुल गांधी, शरद पवार आणि अखिलेश यादवांना निमंत्रित करत पुढील राजकीय वाटचालीबाबत स्पष्ट संकेत दिले आहेत. आम्ही सध्या महायुती, एनडीएसोबत नाही. मी सध्या नवीन घरोबा करण्याच्या तयारीत आहे, असे सूचक विधान करत महादेव जानकर यांनी मोठा निर्णय घेण्याच्या तयारी असल्याचे स्पष्ट केले आहे आणि त्याबाबतची घोषणा त्यांनी थेट दिल्लीतून केली आहे. राष्ट्रीय समाज पक्षाला सन्मानपूर्वक जागा दिल्या तरच आम्ही इंडिया आघाडीसोबत जाण्यास तयार आहोत. ज्या ठिकाणी विजयाची खात्री आहे, त्याच जागा मागण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. लवकरच त्याबाबतची चर्चा सुरू होईल, असं जानकर म्हणाले.



दरम्यान आपण कोणत्या पक्षात जाईल हे जानकार यांना माहीत नसते, पण अखेर ते महायुतीतच येतील, ते स्वतःच वाटोळ करून घेणार नाही, असा विश्वास मंत्री संजय शिरसाट यांनी व्यक्त केला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील युती सरकारसोबत आहेत.आता मात्र आपल्याला दुर्लक्षित केल्याची भावना जानकर यांच्या मनात आहे. आता जानकर महायुतीला रामराम करत आहेत. सध्या महायुतीत इतर पक्षांची गर्दी पाहता, युतीला फारसा फरक पडणार नाही. मात्र, आघाडीसोबत गेल्याने महादेव जानकर यांच्या पदरी काय पडेल हे पाहावं लागेल.

### २६५२ सरकारी कर्मचारी निघाल्या 'लाडकी बहीण'
## सरकारने घेतला मोठा निर्णय

**■मुंबई। प्रतिनिधी :**



महाराष्ट्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे लाडकी बहीण. लाडकी बहीण योजनेसाठी लाखो महिलांनी अर्ज केला होता. लाडकी बहीण योजनेसाठी आलेल्या अर्जांची पडताळणी केल्यानंतर अनेक महिला अपात्र असतानाही त्यांनी या योजनेचा लाभ घेतला असल्याचे समोर आले होते. त्यानंतर या महिलांचे अर्ज बाद करण्यात आले होते. मात्र आता आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. योजनेचा गैरफायदा राज्य सरकारी कर्मचारी महिलांनी घेतल्याच्या तक्रारी आल्यानंतर १.२० लाख महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी लाडकी बहिण योजनेला लाभ घेतल्याची माहिती उघडकीस आली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही असे शासन निर्णयातच स्पष्ट करण्यात आले होते. तरीही महिला कर्मचाऱ्यांनी अर्ज भरले तसंच योजनेचा लाभही घेतला आहे. यात वर्ग तीन आणि वर्ग चारच्या महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आणखी सहा लाख कर्मचाऱ्यांची अशाच पद्धतीने तपासणी केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. माहिती व तंत्रज्ञान विभागाला सामान्य प्रशासन विभागाने १ लाख ६० हजार कर्मचाऱ्यांचा युआयडी डेटा उपलब्ध करून दिला. सेवार्थ प्रणालीवर या कर्मचाऱ्यांची नावे नोंदविलेली होती. त्यापैकी किती महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला, हे तपासण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यात २६५२ महिला कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसा गेला असे निदर्शनास आले. त्यांनी ऑगस्ट २०२४ पासून एप्रिलपर्यंत म्हणजे ९ महिन्यांत प्रत्येकी १३ हजार ५०० रुपये घेतले. याचा अर्थ ३ कोटी ५८ लाखांची कमाई त्यांनी केली असल्याचे समोर आले आहे.

### भारतात कोविड-१९चे ४ नवीन प्रकार

भारतातील अनेक राज्यांमध्ये कोविड-१९ च्या रुग्णांमध्ये वाढ होत असताना, देशात चार नवीन प्रकार आढळले आहेत. आयसीएमआरचे संचालक डॉ. राजीव बहल म्हणाले की, दक्षिण आणि पश्चिम भारतातून अनुक्रमित केलेले प्रकार LF.7, XFG, JN.1 आणि NB.1.8.1 मालिकेचे आहेत. इतर ठिकाणांहून नमुने घेतले जात आहेत आणि नवीन प्रकारांची तपासणी करता यावी म्हणून अनुक्रमित केले जात आहे. प्रकरणे फार गंभीर नाहीत आणि लोकांनी काळजी करू नये, फक्त सावधगिरी बाळगावी. जागतिक आरोग्य संघटनेने देखील त्यांना चिंताजनक मानले नाही. ते देखरेखीखाली ठेवलेले प्रकार म्हणून वर्गीकृत केले आहे. चीनसह इतर आशियाई देशांमध्ये कोविडच्या वाढत्या प्रकरणांमध्ये हा प्रकार दिसून येतो.

NB.1.8.1 चे A435S, V445H आणि T478I सारखे स्पाइक प्रोटीन उत्परिवर्तन इतर प्रकारांपेक्षा वेगाने पसरते. कोविड विरुद्ध तयार केलेल्या प्रतिकारशक्तीमुळे देखील त्यांच्यावर परिणाम होत नाही. कोविडचा JN.1 प्रकार भारतात सर्वात सामान्य आहे. चाचणी केलेल्या अध्यार्हून अधिक नमुन्यांमध्ये हा प्रकार आढळतो. त्यानंतर, BA.2 (२६ टक्के) आणि ओमिक्रॉन सबलाइनेज (२० टक्के) प्रकारांची प्रकरणे देखील आढळतात.



### सावध व्हा! राज्यात ७६ नव्या रुग्णांची नोंद
## रुग्णांची वाढ नेमकी का होतेय?

**■मुंबई। प्रतिनिधी :**

भारतात पुन्हा एकदा कोरोनाव्हायरसचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. देशात सक्रिय रुग्णांची संख्या १२५२ वर पोहोचली आहे आणि आतापर्यंत एकूण मृतांची संख्या १३ वर पोहोचली आहे. मुंबई, ठाण्यासह महाराष्ट्रातही कोरोनाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. राज्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांच्या संख्येत सौम्य वाढ होत असून, गुरुवारी ७६ नव्या रुग्णांची नोंद झाली. यामुळे राज्यातील रुग्णांची संख्या ५९७ झाली आहे. तसेच गुरूवारी एका रुग्णाचा मृत्यू झाल्याने मृतांची संख्या सात झाली. पुणे २१, ठाणे १२, कल्याण-डोंबिवली ८, नवी मुंबई ४, कोल्हापूर आणि अहिल्या पालिका हद्दीत प्रत्येकी १ आणि रायगडमध्ये २ रुग्ण सापडले.ज्या लोकांना लसीकरण करण्यात आले आहे त्यांनी देखील सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. कारण लसीकरण नवीन प्रकाराचा परिणाम रोखू शकत नाही. लसीकरणाची प्रतिकारशक्ती अद्याप पूर्णपणे कमी झालेली नाही. ते तुमच्या शरीराला नवीन प्रकाराशी लढण्यास निश्चितच मदत करू शकते. गेल्या काही दिवसांपासून देशातील विविध राज्यांमध्ये करोना रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यातही केरळ आणि महाराष्ट्रात करोना रुग्णांची संख्या अधिक वाढत आहे. त्यामागे जेएन १ विषाणूच्या उत्परिवर्तनामुळे तयार झालेले एनबी.१.८.१ आणि एलएफ.७ हे करोनाचे नवीन उपप्रकार कारणीभूत असल्याचे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेही एनबी.१.८.१ या उपप्रकाराबाबत सतर्क आदेश दिले आहेत. आरोग्य संघटनेने दिलेल्या माहितीनुसार २०२५ च्या सुरुवातीपासून करोनाच्या प्रकारांमध्ये थोडा बदल झाला आहे.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी, ठाण्यातून तिघे ताब्यात, एटीएसची मोठी कारवाई





**■मुंबई। प्रतिनिधी :**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या तपास संस्थांनी पाकिस्तानी हेरगिरीचा आरोप असणाऱ्या अनेकांना ताब्यात घेतलंय. मूळची हरियाणाची यूट्यूबर ज्योती मल्होत्रा हीदेखील त्यापैकीच एक आहे. दरम्यान, आता याच तपास संस्था आता महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार भारताची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवणाऱ्या महाराष्ट्रातील तिघांना एटीएसने पकडले आहे. घरभेद्यांना पकडण्याच्या मोहिमेत राष्ट्रीय तपास संस्थांना हे मोठे यश मिळाल्याचे म्हटले जात आहे. या तिघांपैकी दोघांची चौकशी करून त्यांना सोडून देण्यात आलं आहे. सध्या एक आरोपी एटीएसच्या ताब्यात असून त्याची कसूनच चौकशी केली जात आहे.

**भारताची गुप्त माहिती पाकिस्तानला दिली...**

या तिघांना ताब्यात घेतल्यानंतर सुरुवातीच्या तपासात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. या आरोपींनी एका पाकिस्तानी महिला एजेंटने फेसबुकच्या माध्यमातून हनी ट्रॅपमध्ये फसवलं. त्यानंतर तिने भारताविषयीची गुप्त माहिती मिळवली. एटीएसच्या सांगण्यानुसार नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या काळात व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून भारताची सैन्य संरचना तसेच इतर महत्त्वाची माहिती पाकिस्तानला दिल्याची माहिती आहे.

**दोघांना चौकशीनंतर सोडून दिलं**

ठाण्यातील एटीएसने गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई केली. आरोपीसोबत इतर दोघांनाही एटीएसच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलं होतं. चौकशी करून नंतर त्यांना सोडून देण्यात आलं. भविष्यात त्यांना पुन्हा एकदा बोलवलं जाण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितिनुसार अटक करण्यात आलेली व्यक्ती मुंबईच्या एका महत्त्वाच्या संस्थेत काम करत होती.

**महिला नागपुरात आली, मात्र...**

दरम्यान, नागपूरची एक महिला एलओसी क्रॉस करून पाकिस्तानात गेली होती. त्यानंतर पाकिस्तानी लष्कराने तिला परत भारताकडे सोपवले. आता ही महिला तिच्या घरी नागपुरात आली आहे. मात्र तिने तिचा मोबाईल पूर्णपणे फॉरमॅट केला आहे. त्यामुळे तपास संस्थांचा संशय बळावला आहे. देशातील वेगवेगळ्या तपास संस्था आता तिची चौकशी करणार आहेत.

**भारताची माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप**

मिळालेल्या माहितीनुसार दहसतवाद विरोधी पथक म्हणजेच एटीएसने महाराष्ट्रातून एकूण तीन कथित हेरांना पकडले आहे. त्यांनी भारताची माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप आहे. हे तिन्ही आरोप पाकिस्तान इन्टेलिजेन्स ऑफिसच्या (पीआयसी) संपर्कात होते, असा एटीएसला संशल आहे. तसेच २०२३ साली झालेल्या देशविरोधी कृत्यांमध्येही त्यांचा सहभाग होता, असे बोलले जात आहे.

## मुंबई, कोकणात दमदार आगमनानंतर मान्सूनला ब्रेक

**■मुंबई। प्रतिनिधी :**

यंदाच्या वर्षी सर्व विक्रम मोडित काढत केरळ, तळ कोकण आणि मुंबईत मे महिन्यात धडकलेल्या मान्सूननं सुरुवातीच्या काही दिवसांमध्ये धरलेला जोर पाहता हा पाऊस काही इतक्यात पाठ सोडत नाही, असंच वाटत होतं. मात्र वाऱ्याची दिशा बदलली आणि पर्यायी राज्यातील हवामानसुद्धा. मागील २४ तासांपासून राज्याच्या कोकण किनारपट्टी भागांसह मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पावसाचा जोर तुलनेनं कमी असल्याचं पाहायला मिळालं. तर, समुद्रही शांत असल्याची बाब निदर्शनास आली. तिथं धाराशिव जिल्ह्याला मात्र प्रचंड पावसानं झोडपलं. कळंब तालुक्यात ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यानं तिथं अनेक घरं आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्याचं पाहायला मिळालं.

हवामान विभागाच्या माहितीनुसार दक्षिण कोकणातील जिल्ह्यांसह दक्षिण मध्य महाराष्ट्राच्या घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर, उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यादरम्यान सोसाट्याचा वारा वाहणार असून, वाऱ्याचा वेग ताशी ४०-५० किमी इतका असेल. मराठवाडा आणि विदर्भामध्ये सध्या पर्जन्यमान अधिक राहणार असून, विदभार्तील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्रतवली आहे. यादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी ५०-६० किमी इतका असेल. मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघरमध्ये मात्र पावसाचा जोर ओसरत असल्याचं पाहायला मिळणार असून, यादरम्यान हवेतील आर्द्रता नागरिकांच्या अडचणींमध्ये अधिक भर टाकताना दिसेल. मुंबई आणि कोकणात तापमानात काही अंशांनी वाढ अपेक्षित असून, मान्सून या भागांमध्ये काही दिवस बेतानंच बरसताना दिसेल. दरम्यान मुंबईकरांना प्रचंड उकाडा आणि घामाच्या धारांचा सामना करावा लागणार असल्यानं हवामानातील हा बदल असह्य होणार आहे.

## हेरगिरीच्या आरोपाखाली एटीएसने घेतलं ताब्यात, कारवाईनंतर रविकुमारचं लग्न मोडलं...

**माझा मुलगा निर्दोष**

मिळालेल्या माहितीनुसार, रविकुमार वर्मा मागील पाच वर्षांपासून मुंबई डॉकयार्डमध्ये कनिष्ठ अभियंता-तंत्रज्ञ म्हणून कंत्राटी पद्धतीने काम करत होता. मात्र गेल्या दोन वर्षांत तो एका पाकिस्तानी गुप्तहेर महिलेच्या संपर्कात आला. त्या महिलेने त्याच्याशी मैत्री केली, त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं आणि मग हळूहळू त्याच्याकडून भारतीय नौदलाशी संबंधित महत्त्वाची, गोपनीय माहिती काढून घेतली, असा आरोप आहे.

पण रविकुमार याच्या आईने मात्र आपला मुलगा निर्दोष असल्याचा दावा केला आहे. माझा पती, रवीचे वडील दारू पितात, घर सांभाळत नाही, आमचा लहान मुलगाही वारला आहे. रविकुमार हा गेली 5 वर्ष नेव्हल डॉकमध्ये कामाला आहे.

फेसबुकवर तो एका महिलेशी संपर्कात आला. ती त्याला नग्न शरीर दाखवून फेस बुक चॅट करत होती, ते पाहून माझा मुलगा घाबरला, मी फेसबूक बंद करतो असं सांगत त्याने माज्याकडे तक्रार केली होती, असा दावाही त्याच्या आईने केला. माझा मुलगा निर्दोष आहे. माझा पती काहीच कामाचा नाही,दारू पिऊन पडलेला असतो. एक मुलगा कॅन्सरने गेला, आमच्या मुलीचं लग्न झालं होतं पण आता घटस्फोट झाला. रवीच आमचा आधार आहे. तो, माझा मुलगा निर्दोष आहे, आता नरेंद्र मोदींनी माज्या मुलाला वाचवावं, अशी मागणी त्याच्या आईने साश्रूनयनांनी केली आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी :**

पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानसाठी हेरगिरी करत संवेदनशील माहिती पुरवल्याचा आरोप असलेल्या अनेकांना भारतीय तपास संस्थांन ताब्यात घेतलं आहे. हाच तपास महाराष्ट्रापर्यंतही पोहोचला असून एटीएसने काल संध्याकाळी तिघांना ताब्यात घेतलं. त्यापैकी एक जण हा ठाण्यातील कळवा येथील असून रविकुमार वर्मा असं त्याचं नाव आहे. एटीएसने महाराष्ट्रातून एकूण तीन कथित हेरांना पकडले आहे. त्यांनी भारताची माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप आहे. रविकुमार वर्मा हा कळव्याचा रहिवासी असून तो पाकिस्तानसाठी हेरगिरी करत असल्याचा आरोप लावण्यात आला आहे.

भारतीय नौदलाची गोपनीय माहिती तो एका पाकिस्तानी गुप्तहेर महिलेला पुरवत होता असा आरोप आहे. त्याच्याच संपर्कात असलेल्या आणखी दोन जणांविरोधातही शासकीय गुपिते अधिनियम (ओ.एस.ए.) आणि यूएपीए अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मात्र आपला मुलगा निर्दोष असल्याचा दावा रविकुमार याच्या आईने केला आहे.

याचदरम्यान आता आणखी एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. एटीएसने काल कारवाई करून रविकुमार याला ताब्यात घेतल्याची बातमी उघड झाल्यानंतर त्याचं ठरलेलं लग्न आता मोडल्याचं समोर आलं आहे. ठाण्याच एटीएसने केलेल्या कारवाईमुळे रविकुमारचं लग्न मोडलं. काही दिवसांपूर्वीच त्याच्या आईने रविकुमारचं लग्न ठरवलं होतं. काही दिवसापूर्वी त्याची आई अयोध्या या गावातून परत आलेली होती , तेव्हाच त्याचं लग्न ठरवलं होतं. मात्र आता हेरगिरीच्या आरोपाखील एटीएसने त्याला अटक केल्यानंतर रविकुमारचं जिच्याशी लग्न ठरलं होतं, त्या कुटुबियांनी हे लग्न करण्यास नकार देत ते मोडल्याचं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान आरोपी रवि वमार्ला काही वेळापूर्वीच ठाण्यातील दहशतवाद विरोधी कार्यालयात आणण्यात आलं असून त्याची चौकशी सुरू झाली आहे. त्याच्या या चौकशीत नेमकी काय माहिती समोर येते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### भर रस्तावर जोडप्याला मारहाण 'ती' मदतीसाठी याचना करत राहिली
## पण उपस्थितांनी व्हिडिओ शूट करण्यात धन्यता मानली

**■गुरुग्राम। प्रतिनिधी :**

नाशिकमधील इंदिरानगर परिसरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. हायवेलगत असेल्या बोगद्याजवळ एका जोडप्याला दोन तरूण मारहाण करत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. इंदिरानगर बोगदा ते दीपाली नगर दरम्यानच्या रस्त्यावर लघुशंकेसाठी थांबलेल्या तरुणाला झाडीत बसून दारू पिणाऱ्या काही बेवड्यांनी बेदम मारहाण केली. विशेष म्हणजे, त्या तरुणाला वाचवण्यासाठी पुढे सरसावलेल्या त्याच्या मैत्रीणीलाही या दारुड्यांनी अमानुषपणे मारहाण केल्याने परिसरात संतापाची लाट पसरली आहे.

**अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल**

अशातच ही संपूर्ण घटना समाजमाध्यमांवर एका व्हिडीओमुळे उघडकीस आली असून, त्या व्हिडीओमध्ये मारहाणीचे थरकाप उडवणारे दृश्य स्पष्ट दिसत आहेत. घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई नाका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मुंबई नाका पोलीस करत आहेत.

**शिवाजी नगर खुनाच्या गुन्ह्यातील तिघे आरोपी जेरबंद**

नाशिक शिवाजी नगर खुनाच्या गुन्ह्यातील तिघे आरोपी जेरबंद झाल्याची माहिती समोर आली आहे. नाशिकच्या गंगापूर पोलिसांनी ही कारवाई केलीय. सीसीटीव्हीच्या आधारे मारेकऱ्यांचा शोध पोलिसांनी लावलाय. गंगापूर पोलिसांच्या पथकाने सिन्नर फाटा ते सायखेडा दरम्यान पाठलाग करून तिघांना अटक केलीय. आदित्य वाघमारे, वैभव भुसारे आणि विशाल तिवारी हे अटक केलेल्यांची नावे आहेत. नसीम शाह या युवकाची मंगळवारी(२७ मे) नाशिकच्या शिवाजीनगर परिसरात हत्या करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करत आरोपीला बेड्या ठोकल्या आहे.



**कुणीतरी वाचवा, पोलिसांना फोन लावा रे... शेवटचं माफ करा, पण..**

दरम्यान, ही घटना घडत होती त्यावेळी या ठिकाणी अनेक नागरिक उपस्थित होते. भर रस्त्यात सुरू असलेल्या या थरारक प्रसंगी पडीत महिला जीवाच्या आकांताने ओरडत होती. मदतीसाठी याचना करत होती. कुणीतरी वाचवा, पोलिसांना फोन लावा रे... शेवटचं माफ करा, अशी गयावया मारहाण करणाऱ्यांना करत होती. मात्र उपस्थितांपैकी त्यांनी वाचवण्यासाठी कुणीही पुढं आला नाही. त्याऐवजी त्यांनी व्हिडीओ काढण्यास पसंती दिली. नाशकात काही तासांपूर्वी एक खून झाला आणि आता हा प्रकार समोर आल्याने नाशिकमध्ये खाकीच काही धाकच उरला नसल्याने असे प्रकार घडत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

## कोल्हापुरात माणुसकीला काळीमा फासणारी घटना!
### महिलेला २ महिन्यांपासून साखळदंडात बांधून ठेवलं... २ कुलुपांच्या चाव्या सापडल्या पण तिसऱ्या...

**■कोल्हापुर। प्रतिनिधी :**

कोल्हापुरातून एक धक्कादायक आणि अमानवीय कृत्याची एक घटना समोर आली आहे. एका ४० वर्षीय महिलेला तब्बल दोन महिने साखळ दंडाने बांधून ठेवल्याची धक्कादायक बातमी समोर आल्यानंतर परिसरात एकच खळबळ माजली आहे. कोल्हापुरातील यादव नगरमध्ये ही घटना असून सारिका हनुमंत साळी असं त्या महिलेचे नाव आहे. कोल्हापूर पोलिसांचे क्राइम ब्रांच आणि राजारामपुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन महिलेची सुटका केली.

घटनास्थळी पोहोचल्यावर महिलेची परिस्थिती पाहून पोलिसांच्याही अंगावर काटा आला. महिलेच्या अंगभर साखळदंड बांधलेला होता. इतकंच नाही तर तीन कुलुपाने तिला बांधण्यात आले होते. पोलिसांनी घराची झाडाझडती घेतल्यावर त्यांना दोन कुलुपांच्या चाव्या सापडल्या. पण तिसरी चावी सापडली नाही, त्यामुळे साखरदंडातून महिलेची सुटका करणे पोलिसांनाही कठीण झालं. त्यानंतर पोलिसांनी चावी बनवणाऱ्या व्यक्तीला बोलवलं आणि तिची अखेर साखरदंडातून सुटका केली. मिळालेल्या माहितीनुसार महिला तिच्या भाच्याकडे राहत होती.

ही घटना इतकी अमानवीय होती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांनाही राग अनावर झाला. त्यांनी संबंधित महिलेच्या भाच्याला तिथेच त्याचा कानशिलात लगावली. संबंधित महिला अपंग असून शेजाऱ्यांना त्रास देत असल्यामुळे घरच्यांनी बांधून ठेवल्याची प्राथमिक माहिती मिळाली. पोलिसांनी संबंधित महिलेचा भाचा अनिरुद्ध सूर्यकांत साळी याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी सुरु केली आहे.

दरम्यान, महिलेची प्रकृती बरी नसल्याने तिला उपचारासाठी कोल्हापूरच्या सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आला. तर पोलिसांनी कुटुंबीयांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उपनेते संजय पवार यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित महिलेच्या कुटुंबातील एका युवकाला मारहाण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही वेळासाठी परिसरातील तणावपूर्ण झालं होतं.



कोल्हापुरातून एक धक्कादायक आणि अमानवीय कृत्याची एक घटना समोर आली आहे. एका महिलेला २ महिन्यांपासून साखळदंडात बांधून ठेवण्यात आलं होतं.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# कोणी कमी तर कोणी हुशार!

यावर्षी मान्सून कसा असेल, याचे भाकीत भारतीय हवामान खात्याबरोबरच स्कायमेटनेही वर्तविले आहे. पण महाराष्ट्रासह देशातील राजकारणाची समीकरणे कधी आणि कशी बदलतील, हे कोणालाच सांगता येणार नाही. गेल्या सहा वर्षांत राज्यातील नागरिकांनी याचा पुरेपूर अनुभव घेतला आहे आणि घेतही आहेत. २०१९ मध्ये ज्यांच्याविरुद्ध लढले त्यांच्याबरोबरच सत्ता स्थापन केल्याचा प्रकार सर्वांनीच पाहिला. त्यानंतर आपलाच पक्ष फोडून तो आपल्या नावावर करण्याचा अजब प्रकारचे साक्षीदार तमाम महाराष्ट्रीय नागरिक बनले. तर गेल्या महिन्यात, म्हणजेच एप्रिलमध्ये, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे एकत्र येण्याचे स्पष्ट संकेत मिळाले. आता वास्तवात ते कितपत उतरतात, हा प्रश्नच आहे. एकूणच वारे कधी आणि कुठून वाहतील, याचा काहीच अंदाज देता येणार नाही. फक्त एवढेच ठामपणे सांगता येऊ शकते की, भाजपा काहीही घडवू शकतो. इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी दैनिकाच्या एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यातून तसेच ध्वनीत होत आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यापैकी कोण उत्तमरित्या संवाद साधू शकतो, असे देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आले. त्यावर त्यांनी दोघेही संवादात कमी पडत असल्याचे सांगितले आणि या स्पष्ट मताबद्दल दोघांकडे दिलगिरीही व्यक्त केली. मुळात, महाविकास आघाडी सरकारच्या काळात एकनाथ शिंदे यांच्याशी देवेंद्र फडणवीस यांनी कशा प्रकारे संवाद साधला याची तपशीलवार माहिती दस्तुरखुद्द एकनाथ शिंदे यांनीच २०२२ मध्ये राज्य विधिमंडळात दिली. रात्री उशिरा आमच्या भेटीगाठी व्हायच्या, असे शिंदे म्हणाले होते. तर, फडणवीस हे हुडी घालून रात्री उशिरा घराबाहेर पडत असत, अशी माहिती त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांना दिली होती. तर, एकवेळ सत्तेशिवाय राहू पण, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर युती करणार नाही, असे त्रिवार सांगतानाच फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना, 'आपद्धर्म नाही, शाश्वत धर्म नाही, कुठलाही धर्म नाही...' असे ठासून सांगितले होते. पण जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला सत्तेत सहभागी करून घेतलेच! बहुदा भाजपला अशाच प्रकारचा संवाद अपेक्षित असावा. आधी आरोप, मग वादंग अन् शेवटी संवाद हीच भाजपाची मोडस ऑपरेंडी पाहायला मिळते. विविध पक्षांतील बडे नेते याच पद्धतीने भाजपच्या तंबूत गेल्याचे सर्वांनीच पाहिले. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे संवादात कमी पडत असल्याचे फडणवीस यांनी म्हटले असले तरी, हे दोन नेते एकमेकांशी संवाद कमी आणि कुरबुर जास्त करत असल्याचेही अनेकदा समोर आले आहे. महायुती सरकारमध्ये सर्वकाही आलबेल असल्याचे वरून कितीही दाखवले जात असले तरी, दिसते तसे नसते, हेच खरे. बर्फ हा नेहमी नऊ दशांश पाण्याखाली असतो आणि एक दशांश वर दिसतो. या नऊ दशांश गोष्टी अशा असतात की, त्यांची वाच्यता जाहीरपणे करता येत नाही. केवळ 'फेव्हिकॉलचा जोड आहे' असे म्हणावे लागते, पण त्याचा तकलादूपणा न सांगताही दिसतो. विधानसभा निवडणुकीच्या वेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे श्रेय घेण्यात दोन्ही नेते आघाडीवर होते. पण निवडणुकीनंतर या योजनेचे निकष अधिक कठोर करून लाडक्या बहिणींची संख्या कमी करण्यास महायुती सरकारने सुरुवात केली. त्यासाठी आर्थिक नियोजनची सबब अजित पवार प्रमुख असलेल्या अर्थ विभागाने दिली आहे. याशिवाय, शिंदे गटाच्याच दोन मंत्र्यांच्या खात्यातील निधी या योजनेसाठी वळविण्यात आल्याने दोन पक्षांतील धुसफूस चव्हाट्यावर आली होती. देवेंद्र फडणवीस यांनी या मुलाखतीत उद्धव ठाकरे यांनी आम्हाला धोका दिल्याचे म्हटले आहे. अशा परिस्थितीत राजकारणामध्ये हातावर हात ठेवून शांत बसता येत नाही. येथे मार्ग शोधून जिवंत राहावे लागते, असे ते म्हणाले. मग, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजप आणि शिवसेनेची सुमारे २५ वर्षांची युती तोडण्यात आली, याशिवाय, २०१९ मध्ये शिवसेनेला मुख्यमंत्रीपद देण्याचे वचन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले होते, पण ते पाळले गेले नसल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला होता. हा धोका नव्हता का? २०१९ मध्ये शिवसेनेने महाविकास आघाडीचा नवा मार्ग शोधला होता, हे मान्य करणार का? विशेष म्हणजे, फडणवीस यांनी या मुलाखतीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचे कौतुक केले. निवडणुकीत जय असो वा पराजय शरद पवार हे आपले कार्य सातत्याने सुरूच ठेवतात, असे फडणवीस म्हणाले. त्यातच दुसरीकडे शरद पवार समर्थक नेते भाजपात जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. त्यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली असली तरी, फडणवीस यांच्या संवादाची ही सुरुवात आहे का?

# मुंबई फक्त राजकारणासाठी नको...

मुंबईच्या राजकारणाला विकासाची दूरदृष्टी लाभली नाही. काँग्रेसच्या काळात स्थानिक नेतृत्व दुर्लक्षित राहिले, तर नंतर राजकारण अर्थकारणाच्याच ताब्यात गेले. नगरनियोजनाकडे दुर्लक्ष झाले, ब्रिटिश काळात नियोजनबद्ध असलेल्या दक्षिण मुंबईसह उपनगरांत वाहतूक, पाणी तुंबणे यांसारख्या समस्या वाढल्या. स्थानिक नागरिकांच्या गरजांपेक्षा विकासकांच्या गरजांना प्राधान्य दिले गेले. जनतेच्या गरजांऐवजी नफ्यावर भर दिल्याने मुंबईच्या सर्वांगीण विकासाची संधी गमावली गेली.



राज्याला दिशा देणारे राजकारण राजधानीचे शहर म्हणून मुंबईत घडत असले, तरी या शहराचे खरे राजकीय महत्त्व सन २००० नंतरच वाढू लागले, ही बाब नाकारता येत नाही. त्यासाठी थोडेसे इतिहासात जावे लागेल.

मुंबईचे राजकीय महत्त्व एका मयार्देपलीकडे वाढू न दिल्याने काँग्रेसच्या राजवटीत प्रभावी असा स्थानिक नेता तयार होऊ दिला गेला नाही. केंद्रात आणि राज्यात सत्ता प्रामुख्याने काँग्रेसचीच होती. एस. के. पाटील, बॅ. रजनी पटेल, मुरली देवरा, गुरुदास कामत असे नेते काँग्रेसने मुंबईला दिले. पण यात जनमानसावर पकड असलेले नेते किती, हा मोठा प्रश्न आहे. परिणामी मुंबईत विकासाच्या योजनांची सुरूवात तत्कालिक गरजांपोटी झाली असली, तरी त्यात फार पुढचा, भविष्याचा विचार नव्हता. त्यातून निर्माण होत गेलेल्या समस्या मुंबईला जागतिक स्तरावरचे स्थान मिळवून देऊ शकत नाहीत.

१९५०, ६०, ७०, ८० या दशकांत काँग्रेस या शहराकडे पक्षीय रसद्पुरवठा, उद्योगजगतावरील वर्चस्व या दृष्टिकोनातून पाहत असे. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांच्या नेतृत्वाखालील कामगार चळवळ काँग्रेसला अस्वस्थ करत असे. या चळवळीचा दबदबा इतका प्रचंड होता की १९६७ साली काँग्रेसचे बिनीचे शिलेदार, मुंबईचे अनभिषिक्त सम्राट म्हणून ओळखले जाणारे एस. के. पाटील यांचा जॉर्ज फर्नांडिस यांनी सणसणीत पराभव केल्यानंतर या पक्षाने हाय खाल्ली. शिवसेनेचे महत्त्व जाणीवपूर्वक वाढू लागले ते त्यावेळच्या राजकीय गरजेतूनच.

मुंबईत शिवसेनेला पुढे चाल मिळू लागली आणि काँग्रेसचे नेतृत्व प्रामुख्याने ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष देणारे असल्याने मुंबईच्या गरजा त्यांच्या प्राधान्यक्रमात शीर्षस्थानी आलेल्या दिसत नाहीत. मुंबईचे असलेले रफिक झकेरिया तेव्हाचे औरंगाबाद, आताचे छत्रपती संभाजीनगर यांना नेतृत्व देऊ शकत असले, तरी त्यांचा मुंबईत वापर झालेला दिसत नाही. राज्याच्या मंत्रिमंडळात मुंबईतील चेहरे फारसे नसत आणि असले, तरी त्यांना राजकीय महत्त्व दिले जात नसल्याने त्यांचा प्रभावही पडला नाही. किंवा मुंबईच्या विकास योजना पुढे रेटण्यासाठी त्यांचा उपयोग झाला नाही. १९९० ते १९९९ या काळात शिवसेना राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी आली. मुंबईतही या पक्षाचे बरेच आमदार निवडून येऊ लागले आणि मग कुठे काँग्रेसला ग्रामीण राजकारणाबरोबरच मुंबईच्या तेव्हाच्या ३४ (आता ३६ आहेत) विधानसभा मतदारसंघांची गरज भासू लागली.

मुंबईचे शांघाय आणि काय काय.. या चर्चा निरर्थक ठराव्यात इतके मुंबईच्या विकासासाठी बोलून झाले आहे. केंद्रात डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असताना जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान योजना आली आणि त्याचा काहीसा लाभ मुंबईला होऊ लागला. पूर्व द्रुतगती मार्ग ही याच योजनेची देण. केंद्राच्या पुढाकाराने हा रस्ता झाला, मुंबईच्या वाहतूक समस्येवर मोठा मार्ग निघाला. टोलशिवाय रस्ता असू शकतो हेच आधी लोकांना पटत नसे. त्या आधी शिवसेना-भाजपाने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि वरळी-वांद्रे सागरी मार्गाची पायाभरणी करून ठेवली होती. ते मार्ग काँग्रेसच्या राजवटीत लोकांना खुले झाले, पण टोलसह. काँग्रेसने मोनोरेल आणली पण ती नेमकी का, कोणासाठी, कोणता विचार करून आणली याची उत्तरे मिळतात ती वडाळा परिसरात हातोहात विकल्या गेलेल्या काही उच्चभ्रू गृहसंकुलातून. मोनोरेलचा लाभ हे प्रकल्प विकसित करणाऱ्यांना झाला असावा, असे म्हणण्यास जागा आहे.

मुंबई शहराचा विकास करताना ब्रिटिशांनी काय धोरण आखले, कशाला प्राधान्य दिले याचा विचार आपण केला नाही. ब्रिटिश काळात बेटावरील शहराला महत्त्व होते कारण तेच त्यांचे व्यापारी केंद्र होते. त्यातही फोर्ट आणि कुलाब्याचा काही भाग त्यांच्यासाठी महत्त्वाचा असल्याने इथे बऱ्याच इमारती आखीव रेखीव पद्धतीने, रस्ते आणि चौक नियोजनपूर्वक बांधलेले दिसतात. आजही बोरीबंदर, मेट्रो सिनेमा, हुतात्मा चौक, चर्चगेट, राज्य पोलीस मुख्यालय येथील चौक व रस्ते यांचे नियोजन पुरे पडते ते याचसाठी. शिवाय पाऊस किती पडतो याचा अभ्यास करून पर्जन्यवाहिन्या, जल व मलनिस्सारण योजना आखल्याने मुंबई शहरात, विशेषतः दक्षिण मुंबईत पाणी तुंबलेय असे कधी झाले नाही. त्यांच्या काळात मरिन ड्राईव्ह, चर्चगेट रेक्लमेशन, ओव्हल मैदान परिसरातील विकास योजना धोरणपूर्वक आखल्या गेल्याने तिथे फारसा बदल करण्यास आपल्याला वाव राहिला नाही. मुंबईत आर्द्रतेचे प्रमाण खूप असल्याने उकाडा जाणवतो म्हणून जुन्या इमारतींच्या खिडक्या हवा मिळावी यासाठी खूप मोठ्या दिसतात. आता आपण वातानुकूलन यंत्रणा बसवून त्या बंद करतो आणि खूप सूर्यप्रकाश मिळू शकत असतानाही पडदे बंद करत दिवे लावून काम करतो.

१९८० नंतर मुंबईच्या रिअल इस्टेटचे महत्त्व जसजसे वाढू लागले तशी नगरनियोजन या विषयाची वाताहत झाली. शहराला उद्याने, मोकळ्या जागा, वाहनतळ याचीही गरज असते हे विसरत, 'दिसली जागा की दे इमारतीला परवानगी, एफएसआय-टीडीआर वाढव नेत्या, तुला राजकारणाची शप्पथ हाय', असे म्हणत इतक्या इमारती उभ्या केल्या की या शहराच्या पायाभूत सुविधा वाढीव बांधकाम पेलण्यासाठी सक्षम आहेत का याचाही विचार केला गेला नाही. पाऊस खूप पडला म्हणून पाणी साचले, हे शाळकरी तत्त्वज्ञान झाले. दक्षिण मुंबईत पाऊस नेहमीच भरपूर पडतो पण त्याचा निचरा करणारी यंत्रणा पावसाच्या क्षमतेला पुरत होती. आता काळबादेवी, गिरगाव अशा भागात दाटीवाटीने वसलेल्या चाळींचे रूपांतर टोलेजंग इमारतीत होत आहे. मलबार हिल, पेडर रोड, ताडदेव येथील जुन्या तीन-चार मजली इमारतींचा पुनर्विकास करताना भले मोठे टॉवर येत असल्याने शहराच्या यंत्रणेवर ताण हा येणारच. पण त्याचा विचार करायला वेळ कोणाला आहे? मुंबईचे राजकारण अर्थकारणाच्या ताब्यात आणि अर्थकारण बांधकाम क्षेत्राच्या ताब्यात गेल्याने नगरनियोजन आणि भविष्यवेधी विचार दूर गेला आहे. आज केवळ निवासी इमारती उभ्या राहत असून तेथील घरे किती शे कोटींना विकली गेली व सरकारला मुद्रांक शुल्कापोटी किती उत्पन्न मिळाले याचे आकडे वाचण्यात धन्यता मानली जात आहे.

उपनगरांचे हाल तर विचारायलाच नकोत. आंतरराष्ट्रीय तोंडवळा असलेल्या मुंबई शहरातील कॉर्पोरेट जगताला आणि इथे वसलेल्या कपड्याच्या बाजाराला, हिरे व्यापार व सरकारी कार्यालयांना मनुष्यबळ व अन्य गरजा पुरविणारा भाग म्हणून उपनगरांकडे पाहिले गेले. ब्रिटिशांनी मुंबई शहराचे नियोजन कसे केले याचा विचार उपनगरांसाठी न केल्याने आजही पावसाच्या पाण्याने हाहाकार माजणे, वाहतुकीची कोंडी, दिशाहीन विकास यात हा भाग अडकून पडला आहे.

मुंबईला या शहराच्या विविधांगी विकासासाठी नेतृत्व हवे होते. पण आपल्या व्यवस्थेत राजकीय पकड महत्त्वाची आणि त्यासाठी अधिकाधिक लोक निवडून आणणे हेच महत्त्वाचे मानले जाते. त्याने स्थानिक सुभेदार तयार होतात व त्यांना समांतर व्यवस्था चालविण्यात रस असतो. त्यापुढे त्या त्या पक्षाच्या नेतृत्वाने मान तुकविली की रस्ते कसे आणि किती रुंद असावेत, वाहतूक नियोजन कसे असावे, वाहनतळ किती असावेत, रेल्वे स्थानक, बस स्थानक कसे असावे, याबाबतचे नियोजन कोलमडून पडते.

निवासी परिसराच्या गरजा काय, याचा विचार मागे पडत गेला आणि विकासाची दिशा विकासकाभिमुख होत गेली. विकासाची कामे विकासकांची गरज समोर ठेवून काढत गेल्याने सुसंगती राहत नाही. 'हॅपीनेस इंडेक्स - आनंदाचा निर्देशांक' या निकषावर मुंबईत राहणारा सामान्य माणूस दैनंदिन जीवन किती समाधानाने व्यतीत करतो याची पाहणी केली, तर फार भीषण चित्र समोर येण्याची शक्यता आहे. केवळ चाकरमानीच नव्हे तर साध्या वस्तीत, चाळीत, झोपडपट्ट्यांमधून राहणारे नागरिक सुद्धा कष्ट करून मुंबईच्या, राज्याच्या उत्पन्नात भर घालत असतात. त्यांच्या गरजांचा कितपत विचार झालाय यावर चर्चा करण्याची तयारी आहे का? मुंबईत गेल्या काही वर्षांत किती इमारतींना आग लागली, किती लोक गेले, त्यात चूक कोणाची होती, चूक केलेल्यांवर जरब बसेल अशी कारवाई झाली का, एसआरएच्या इमारती कशा बांधल्या गेल्या, तेथील रहिवासी समाधानी आहेत का, त्यांची एखादी इमारत पुनर्वसनाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून आपण अभिमानाने देशाला, जगाला दाखवू शकतो का, या प्रश्नांना उत्तरं देण्याची तयारी आहे?

# कदम कदम बढाए जा...



जानेवारी १९५५मध्ये उद्घाटन झालेली खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी - अर्थात भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलासाठी अधिकारी घडवणारी एक संयुक्त प्रशिक्षण संस्था. ती आपल्या संरक्षण दलांचा कणा आहे. आज (शुक्रवार, ३० मे), ७५ वर्षांनी या प्रांगणात प्रथमच युवतींची सक्षम पावले 'अंतिम पग' ओलांडत आहेत, सन्मानपूर्वक शपथ घेऊन बाहेर पडत आहेत. तीन वर्षे अफाट मेहनत करून, येथून प्रशिक्षित होऊन बाहेर पडणारी भारतीय युवतींची ही पहिलीच तुकडी आहे.

### आत्तापर्यंतचा प्रवास

स्वतंत्र भारताच्या लष्करासमोरची आव्हाने खूप वेगळी होती. लष्करात प्रवेश मिळवून हातात प्रत्यक्ष शस्त्र घेण्यासाठी मुलींना बरीच वर्षे वाट बघावी लागली. येथे स्त्री-पुरुष समानतेपेक्षाही देशाची सुरक्षितता हा विषय प्राधान्याचा होता. १ नोव्हेंबर १९५८ रोजी भारतीय सैन्याच्या वैद्यकीय विभागाने (एएमसी) पात्र महिलांना नियमित स्वरूपात प्रवेश द्यायला सुरुवात केली. पुढे १९९२मध्ये, विशेष तरतुदीअंतर्गत मेडिकल व्यतिरिक्त अन्य युवतींची लष्करामध्ये पाच वर्षांसाठी अधिकारपदावर नेमणूक करण्यास सुरुवात झाली. यथावकाश हा कालावधी वाढवून १० वर्षे आणि नंतर १४ वर्षांचा झाला. सन २००८पासून महिला अधिकाऱ्यांचा प्रशिक्षण कालावधी २४ आठवड्यांवरून शॉर्ट सर्व्हिस कमिशनमधून येणाऱ्या पुरुष अधिकाऱ्यांप्रमाणेच थेट ४९ आठवडे करण्यात आला.

१७ फेब्रुवारी २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयामुळे महिलांसाठी अनेक ठोस धोरणे भारतीय लष्करात आखली गेली. कायमस्वरूपी कमिशन (२० वर्षे सेवा) प्रदान करण्यात आले. त्यामुळे वरिष्ठ पदांसाठी त्यांचा विचार होऊ लागला. आज अनेक महिला अधिकारी रेजिमेंटच्या कमांडिंग ऑफिसर होऊन, अत्यंत सक्षमपणे नेतृत्व करीत आहेत.

### 'एनडीए'मध्ये युवतींचा प्रवेश

भारतीय संरक्षण दलांत जाणाऱ्या मुलींसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरलेला निर्णय म्हणजे एनडीएमध्ये प्रवेश! हा टप्पा मुळीच सोपा नव्हता. कायद्याचे अस्त्र वापरून तो खेचून आणावा लागला. डॉ. कुश कालरा यांनी दाखल केलेल्या याबाबतच्या याचिकेत, मुलींना एनडीएच्या प्रवेश परीक्षेला बसण्यासाठी केवळ लिंगाच्या आधारावर मज्जाव करणारे भारतीय लष्कराचे धोरण, संविधानाने प्रत्येक नागरिकाला प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांचे थेट उल्लंघन करणारे आहे, असा ठोस युक्तिवाद करण्यात आला. १८ ऑगस्ट २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने एनडीएसाठी मुलींचा मार्ग मोकळा केला. त्यांना प्रवेश परीक्षेला बसण्याची अनुमती मिळाली. त्याच्या निकालावर आधारित प्रवेशासंबंधी तरतूद करण्यात यावी, या न्यायालयाच्या आज्ञेप्रमाणे मुलींविषयी पुढचे धोरण आखण्यात आले. सन २०२२पासून केंद्रीय लोकसेवा आयोगाने महिलांना अर्ज करण्याची परवानगी दिली. नेमून दिलेल्या परीक्षा आणि चाचण्या उत्तीर्ण करून, २०२२पासून युवतींची पहिली बॅच खडतर सैन्य प्रशिक्षणासाठी दाखल झाली. त्यांना समाविष्ट करण्यासाठी, त्यांचे वास्तव्य सुलभ व्हावे यासाठी प्रबोधिनीने काही अंतर्गत बदलही केले, सुविधा उभारण्यात आल्या.

### आव्हानांची मालिका

प्रशिक्षणादरम्यान अनेक आव्हानांना या मुलींनी खंबीरपणे तोंड दिले. तीन वर्षांचे आत्यंतिक खडतर प्रशिक्षण यांना झेपेल का? यांच्यासाठी वेगळे स्क्वाड्रन सुरू करण्यात येईल, की आधीच असलेल्या १८ स्क्वाड्रनमध्ये यांना विभागण्यात येईल? अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या कॅम्प ग्रीनहॉर्न, कॅम्प रोव्हर्स, कॅम्प तोरणा इत्यादी कॅम्पना मुली जाणार का? किती तरी शंका होत्या; पण दृढ इच्छाशक्तीच्या जोरावर, मेहनतीने सगळे आत्मसात करीत, आज त्या 'पासिंग आउट'साठी सज्ज झाल्या आहेत.

### अपूर्व आत्मविश्वास

तिन्ही सैन्यदलांच्या या एकमेव ॲकॅडमीतून १७ युवती आज बाहेर पडत आहेत. यापैकी तीन नौदलात, पाच हवाईदलात, तर नऊ जणी लष्करात प्रवेश करतील. पुढच्या एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी त्या नौदल, हवाईदल किंवा लष्कराच्या ॲकॅडमीत त्या जातील. तिथून पुढे अधिकारी म्हणून बाहेर पडतील. पहिली बॅच म्हणून आमच्या जबाबदारीची आम्हाला जाणीव आहे, आम्ही सीमेवरचे कोणतेही आव्हान झेलण्यासाठी सक्षम आहोत, असे त्या सांगतात.

### स्त्रीशक्तीची नेत्रदीपक कारकीर्द

सन २०१०मध्ये ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी, चेन्नई येथील प्रशिक्षणात सर्वोत्कृष्ट कॅडेट म्हणून मानाची तलवार मिळवणारी पहिली युवती अधिकारी मेजर दिव्या अजितकुमार, काबुलमध्ये २०१०मध्ये भारतीय दूतावासावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात अनेक नागरिक आणि सैनिकांचे प्राण वाचवणाऱ्या, 'सेना मेडल' या पुरस्काराने सन्मानित कर्नल मिताली मधुमीता, 'वंडर वुमन' म्हणून ओळख असलेल्या आणि हजारो पोलादी सैनिक घडवणाऱ्या भारताच्या पहिल्या स्त्री कमांडो ट्रेनर सीमा राव या सगळ्या वीरांगना प्रेरणादायी आहेत. एप्रिल २०२३मध्ये चेन्नई येथे प्रशिक्षण झालेल्या पाच महिला अधिकारी तोफखाना विभागात प्रथमच नियुक्त करण्यात आल्या. वायुसेनेचे कॉम्बॅट युनिट कमांड करणाऱ्या ग्रुप कॅप्टन शैलजा धामी, युद्धनौकेचे नेतृत्त्व करणाऱ्या लेफ्टनंट कमांडर प्रेरणा देवस्थळी, सियाचेनमधील कुमार पोस्टवर तैनात होणाऱ्या शिवा चौहान, सैन्यदलातील पहिल्या महिला ड्रोन प्रशिक्षक मेजर ईशा ठाकूर, जगमित कौर अशी ही वाट निर्माण करणाऱ्यांची यादी दिवसेंदिवस वाढत आहे. एव्हरेस्ट शिखराची आव्हानात्मक चढाई असो, वा एखादी क्लिष्ट आंतरराष्ट्रीय मोहीम, भारतीय सैन्यातल्या स्त्रियांनी सर्वत्र यशाचा झेंडा रोवला आहे. सैन्यातील स्त्री शक्तीच्या अशा किती तरी उल्लेखनीय कथा सांगता येतील. फायटर पायलट म्हणूनही त्या शत्रूच्या विमानांचा अचूक वेध घेत आहेत.

### पुढील आव्हाने

सैन्यात जाणे हा करिअरचा उत्तम पर्याय असू शकतो, याची जाणीव मुलींना होत आहे. सरंक्षण दले म्हणजे शारीरिक शक्तीचे प्रकटीकरण हे खरे असले, तरी आजच्या युद्धात तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची झाली आहे. वेगवेगळी शस्त्रे, उपकरणे असोत, वा दळणवळण, संपर्क, रसद अशा इतर महत्त्वाच्या बाबी, आज आधुनिकीकरणामुळे पूर्ण चित्र बदलले आहे. त्यामुळे स्त्रियांसाठी तिन्ही दलांत नवनवीन संधी निर्माण होत आहेत. मुळात नेतृत्वाचे स्वरूप आमूलाग्र बदलत आहे. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर परिस्थितीचे योग्य आकलन करीत, प्रशासन कौशल्यातून महिला अधिकाऱ्यांनी स्वतःची योग्यता दाखवून दिली आहे. तथापि, लढाई अजून संपलेली नाही.

# राष्ट्रविरोधी मानसिकतेचे भेसूर चेहरे

पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराच्या 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेने पाकिस्तानला जबर धक्का दिला. या कारवाईमुळे जागतिक पातळीवर भारताचा आत्मविश्वास उंचावला. मात्र, काँग्रेसने या विजयावर संशय घेत राजकारण केले. राहुल गांधी व विजय वडेट्टीवार यांची वक्तव्ये लष्कराविरोधी ठरली. इतिहासात इंदिरा गांधींना विरोध असूनही विरोधकांनी पाठिंबा दिला होता, हे विसरून आजचा विरोध निष्कृष्ट पातळीवर गेला असल्याचे नमूद केले आहे.



पहलगाम येथील हल्ला पाकिस्तानमधील दहशतवादाला पोसणाऱ्या शक्तींनी घडवून आणला होता. त्यामुळे पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना धडा शिकवण्यासाठी सैन्यदलाच्या पातळीवर तसेच राजनैतिक पातळीवरही कठोर उत्तर देणे अत्यंत गरजेचे होते. पाकिस्तानविरुद्ध केलेल्या कारवाईला अभूतपूर्व यश मिळाले. त्यामुळे पाकिस्तानला शस्त्रसंधीसाठी गुडघे टेकावे लागले. त्याचबरोबर सिंधू जल कराराला स्थगिती देण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंतीही करावी लागली. अमेरिकेच्या प्रसारमाध्यमांनी तसेच संरक्षणविषयक तज्ज्ञांनी भारताच्या सैन्यदलाने केलेल्या कारवाईत पाकिस्तानच्या नुकसानीची विस्ताराने माहिती दिली आहे. पाकिस्तानची हवाई सुरक्षा यंत्रणा भेदत भारताच्या हवाई दलाने पाकिस्तानच्या सहा हवाई तळांचे मोठे नुकसान केले. आपले नुकसान झाकण्यासाठी पाकिस्तानने नेहमीप्रमाणे खोटे दावे केले. हे चुकीचे दावे पाकिस्तानच्या जनतेलाही फसवू शकले नाहीत.

भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे कसे नुकसान झाले याचे खणखणीत पुरावे पत्रकार परिषदांमधून दिले. भारतीय सैन्यदलाच्या बिनतोड पुराव्यांचा पाकिस्तानला प्रतिवाद करता आला नाही. या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याच्या कामगिरीला अभिवादन करण्यासाठी देशात उत्स्फूर्तपणे तिरंगा यात्रा निघाल्या. भारतीय सैन्यदलाच्या अभूतपूर्व कामगिरीचा गौरव होत असताना दुसरीकडे या विषयातही क्षूद्र राजकारण आणण्याचे प्रयत्न काँग्रेससारख्या प्रमुख विरोधी पक्षाने केले. लोकसभेतील विरोधी पक्ष निभावणाऱ्या राहुल गांधी यांनी पाकिस्तानातील सत्ताधारी पक्षाला शोभेल अशा प्रकारचे वक्तव्य केले. ''ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताची किती विमाने पडली?'' असा सवाल त्यांनी जाहीरपणे विचारत भारतीय सैन्यदलाच्या कामगिरीवर शंका उपस्थित करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय लष्कराच्या पत्रकार परिषदांमध्ये पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांचे कसे नुकसान झाले, याच्या उपग्रहाद्वारे घेतलेल्या प्रतिमा प्रसारित करण्यात आल्या होत्या. पाकिस्तान लष्कराने भारताचे लढाऊ विमान पाडल्याचा दावा केला होता. याचे पुरावे एका पत्रकाराने मागताच पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी, ''भारतीय विमान आम्ही पाडल्याचे अनेक पुरावे समाज माध्यमांवर उपलब्ध आहेत,'' असे उत्तर देत आपल्या अकलेचे किती दिवाळे निघाले आहे, याचे दर्शन घडविले.

पाकिस्तानातील किती दहशतवादी तळ नष्ट झाले, पाकिस्तानच्या किती हवाई तळांचे नुकसान झाले ही माहिती जाणून घेण्यापेक्षा राहुल गांधी यांना भारताच्या सैन्यदलाचे किती नुकसान झाले याची माहिती विचारण्यातच का रस असावा, याचे उत्तर खुद्द राहुल गांधी देऊ शकतील. असा प्रश्न विचारून राहुल गांधींनी सैन्यदलाच्या कामगिरीबद्दल आनंदोत्सव साजरा करण्याऐवजी भारतीय लष्कराचे किती नुकसान झाले, यासारखे प्रश्न विचारून राजकारणातील विरोधाची मानसिकता किती खालच्या पातळीवर जाऊ शकते, याचे पुरावेच सादर केले.

अशा पद्धतीचे प्रश्न सैन्यदलाच्या प्रमुखाला वैयक्तिकरीत्या भेटूनही विचारता येऊ शकतात. पण तेवढी परिपक्वता आणि राजकारणातील विशाल दृष्टिकोन याचा अभाव आपल्याकडे आहे, हे वारंवार दाखवून देण्याची हौस राहुल गांधींना आहे, त्याला आपण तरी काय करणार?

१९७१ मध्ये बांगलादेशच्या मुक्ती संग्रामात बांगलादेश मुक्ती वाहिनीला भारताने का पाठिंबा दिला, याची माहिती अन्य देशांना कळावी यासाठी त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारतातील विविध पक्षातील नेत्यांचे शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला होता. या शिष्टमंडळाचे नेतृत्व श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यावेळच्या जनसंघाचे लोकसभेतील गटनेते अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडे सोपविले होते. १९७१ च्या युद्धावेळी जनसंघासह सर्व विरोधी पक्षांनी केंद्र सरकारला निःसंदिग्ध पाठिंबा दिला होता. त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असलेल्या रिचर्ड निक्सन यांनी पाकिस्तानला पाठिंबा देणारी वक्तव्ये केली होती. जनसंघ, स्वतंत्र पक्ष यांनी आपली काँग्रेसविरोधाची भूमिका बाजूला ठेवत इंदिरा गांधी सरकारच्या पाठीशी एकमुखाने उभे राहण्याचा निर्णय घेतला. अटलबिहारी वाजपेयी यांनी लोकसभेतील भाषणात अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांच्या वक्तव्याचा कडाडून निषेध करत इंदिरा गांधी सरकारच्या पाठीशी जनसंघ खंबीरपणे उभा आहे, याची ग्वाही संपूर्ण देशाला दिली.

देशावरील दहशतवादाच्या संकटाचा सामना करण्यासाठी विरोधी पक्ष सरकारच्या मागे उभे आहेत, हे जगाला कळावे यासाठी लोकसभेचे विरोधी पक्षनेतेपद भूषविणाऱ्या राहुल गांधींनी राजकारण बाजूला ठेवत सरकार आणि लष्कराला पाठिंबा देणारी वक्तव्ये करणे अपेक्षित होते. ही किमान अपेक्षाही राहुल गांधींना पूर्ण करता आली नाही.

आपल्या पक्षाचा सर्वोच्च नेता अशी विधाने करतो आहे, हे पाहून विजय वडेट्टीवार यांच्यासारख्या वाचाळवीरांनाही चेव आला. भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरची माहिती देताना सादर केलेले छायाचित्रांचे पुरावे खोटे आहेत, अशी मुक्ताफळे वडेट्टीवारांनी दिवसाढवळ्या उधळली. या वक्तव्याबद्दल वडेट्टीवार यांच्यावर समाजमाध्यमांमधून जोरदार टीका झाली. तरीही वडेट्टीवारांनी सैन्यदलाची माफी मागितली नाही. काँग्रेसच्या राष्ट्रीय आणि राज्यातील नेतृत्वानेही वडेट्टीवार यांना अशा वक्तव्याबद्दल खुलासा विचारला नाही. काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाला आपल्या प्रादेशिक नेतृत्वाकडून अशाच वक्तव्याची अपेक्षा असावी.

केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूरबाबत अन्य देशांना माहिती देण्यासाठी शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला. या शिष्टमंडळाचे नेतृत्व ज्येष्ठ काँग्रेस नेते शशी थरूर यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यावरूनही काँग्रेसने कोत्या मनोवृत्तीचे दर्शन घडविले. मोदी सरकारला विरोध करताना आपण थेट राष्ट्रविरोधी भूमिकेत शिरतो आहोत, याचे भानही काँग्रेस नेतृत्वाला राहिलेले नाही.

## टोमॅटोची व चिंचेची चटणी

**साहित्य :** अर्धा किलो टोमॅटो, ५-७ लसणाच्या पाकळ्या, अर्धी वाटी तेल, चमचाभर मोहरी, आवडीनुसार तिखट व मीठ, थोडासा चिंचेचा गाळलेला कोळ, अर्धा चमचा मेथी दाणे, थोडासा कढीपत्ता व हिंग, दोन चमचे साखर.

**कृती :** सर्वप्रथम कढईत तेल घालून हिंग व मेथी परतून घ्या. त्याची पावडर करा. लसूण आणि टोमॅटोही मिक्सरमध्ये घालून त्याची पेस्ट करून घ्या. ती पेस्ट घट्ट होईपर्यंत शिजवा. आता एका कढईत जास्त तेल घालनू त्यावर मोहरी व कढीपत्त्याची फोडणी तयार करा. त्यात चिंचेचा कोळ, हिंग, मेथीची पावडर, मीठ, तिखट घाला. कोळ शिजू लागला की टोमॅटोची पेस्ट व साखर घालून पाच मिनिटे शिजवा.



नृत्य हे मन, शरीर आणि आत्मा यांच्यासाठी समग्र क्रियाकल्प आहे. नृत्य एक शारीरिक क्रियाकल्प आणि सर्जनशील भावनेच्या माध्यमातून वापरल्याने, ऊर्जा कुशलतेने हाताळण्यास मदत करते आणि यामध्ये नृत्य आर्ट कौशल्य, ज्ञान आणि समज विकसित होण्यास मदत शिकण्यासोबतच लोक काही तरी शोधत असतात आणि त्यांना ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी होतात. ज्या लोकांना अंतर्दृष्टी समजून त्यांना स्वत:ला व्यक्त करण्यासाठी एक प्लॅटफॉर्म मिळते आणि त्यांचे सकारात्मकरीत्या परिवर्तित होते.

निर्माण होणारी आणि परफॉर्मिंग होते. नृत्य आवडणाऱ्या घ्यायची असते व्यक्तिमत्त्व

## डान्स करताय? हे फायदे समजून घ्याच





**सध्याच्या** काळामध्ये आपला बहुमूल्य वेळ तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया घेते, तेव्हा नृत्य हा एक असा छंद आहे जेथे एखादी व्यक्ती शिकू शकते, आनंद घेऊ शकते आणि त्याच वेळी कामही करू शकते. प्रत्येक वर्गामध्ये फिटनेस लेवल, आत्मविश्वास, लक्ष केंद्रित करणे, एकाग्रता, सांघिक भावना, सकारात्मक विचार, शिस्त, शरीराची ठेवण असे सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते. डान्स नेहमी स्वच्छ वातावरणात शिकला जातो त्यामुळे मनही प्रसन्न राहते. प्रत्येक विद्यार्थ्याला किंवा ग्रुपकडे समान लक्ष दिल्याने समानतेची भावना मिळते. नृत्य शिकत असताना फक्त शारीरिक क्रियाकल्प करत नाहीत तर यामधून आत्मविश्वास वाढतो, रक्त अभिसरण प्रक्रिया सुधारते, मांसपेशी मजबूत होतात आणि वजन वाढते; चांगले समन्वय आणि कौशल्य विकसित होते. नृत्य हे शरीरातील ऊर्जा आणि भावना बाहेर सोडण्याचा एक चांगला मार्ग आहे. जेव्हा आपण नृत्य करतो तेव्हा घाम येतो आणि घामाद्वारे चांगले वाटणारे एण्डॉर्फिन बाहेर उत्सर्जित होते, ज्यामुळे आपल्याला आनंदी वाटते. चांगले संगीतही मनाला शांती देते. नृत्य हे संगीताला जिवंत रूप देण्याचे काम करते. शिकण्याची पद्धत ही परस्पर संवादात्मक असल्याने शिक्षण प्रक्रिया तणावमुक्त आणि अधिक मजेदार असते.

माझ्यासाठी आरोग्य ही एक मनाची स्थिती आहे आणि फिटनेस हा जगण्याचा मार्ग. तंदुरुस्त शरीरामध्ये निरोगी मन असते. नृत्य संपूर्ण फिटनेस, सहनशक्ती आणि स्नायूंची बळकटी तसेच संपूर्ण शरीरामध्ये ताकद वाढवण्यास मदत करते. यात कार्डियो व्हॅस्क्युलर / एरोबिक फिटनेस, आणि शरीरातील लवचिकतेसाठी कोर स्ट्रेचिंगचा समावेश केला जातो. ग्रुपमध्ये एकत्रितपणे काम केल्याने संघाचे महत्त्व तसेच सांघिक भावना वाढते. नृत्यासाठी भरपूर सहनशक्ती आवश्यक असते जी शरीर चपळ बनवण्यास मदत करते. अशा प्रकारे नृत्य मधून मनःशांती, एकाग्रता, चपळता, तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यास मदत असे अनेक प्रकाचे फायदे होतात.

## रिकाम्या पोटी प्या गुळ-जिऱ्याचे पाणी आरोग्यास ठरेल लाभदायक

**प्रत्येकाच्या घरी स्वयंपाकघरामध्ये जिरे सहज उपलब्ध होते. जिऱ्याचा वापर अनेक भाज्या बनवताना केला जातो. जिऱ्यामुळे अन्न पचायला मदत होते. तसेच गुळदेखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात गुळाचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात.**

गुळ आरोग्यासाठी एक वरदान मानला जातो. आयुर्वेदातही गुळाचे महत्त्व सांगितलेले आहे. आपल्याला माहीत आहे की, गुळ आणि जिरे आपल्या आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे? चला जाणून घेऊयात याचे शरीराला होणारे फायदे...

**ॲनिमिया रुग्णांसाठी फायदेशीर :** गुळ आणि जिऱ्याचे पाणी पिण्याने ॲनिमिया किंवा रक्ताची कमी भरून निघण्यास फायदेशीर ठरते. तसेच रक्तामधील अशुद्धता दूर होते.

**डोकेदुखीपासून आराम :** थंडीमध्ये बऱ्याच लोकांना डोकेदुखीचा त्रास जाणवतो. अशावेळी गुळ-जिऱ्याचे पाणी पिण्याने फायदा होतो.

**कंबरदुखीवर फायदेशीर :** हिवाळ्यात अनेकांना कंबरदुखीचा त्रास होतो. जर गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने कंबरदुखीपासून आराम मिळतो.

**रोगप्रतिकार क्षमता वाढवते :** गुळ आणि जिरे आपल्या शरीरात घाण साफ करण्यासोबतच शरीराची रोग प्रतिकारक क्षमता वाढवण्यास मदत करते.

**मासिक पाळीच्या त्रासापासून आराम :** गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने अनियमित मासिक पाळी आणि पोटदुखीच्या समस्या दूर होतात.

**गुळ आणि जिऱ्याचे पाणी कसे बनवावे**

एका वाडग्यात दोन कप पाणी घ्या. यामध्ये एक चमचा गुळाचा चुरा आणि एक चमचा जिरे टाकून चांगली उकळी घ्या. यानंतर हे पाणी कप घेऊन पिऊ शकता. मात्र लक्षात ठेवा, हे पाणी सकाळी रिकाम्या पोटी घेणे आवश्यक आहे.



## एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ (पर्यावरण कायदा) मध्ये करिअर बनवा, पात्रता, अभ्यासक्रम, शीर्ष महाविद्यालय, व्याप्ती जाणून घ्या

**एलएलएम इन एन्व्हायरमेंटल लॉ हा पूर्णवेळ पीजी प्रोग्राम आहे ज्यामध्ये २ वर्षांचा कालावधी आहे ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण, हवामान बदल संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर यासाठी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर फ्रेमवर्क समाविष्ट आहे. या अभ्यासक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरण कायद्याशी संबंधित विषय जसे की जल कायदा, व्यवसाय आणि व्यापार, विविध प्रकारचे प्रदूषण, जमिनीचे प्रश्न, पर्यावरणीय न्याय इत्यादी विषय शिकवले जातात.**




**पात्रता :** उमेदवारांनी मान्यताप्राप्त महाविद्यालय किंवा विद्यापीठातून पदवी + एलएलबी किंवा बीएएलबीमध्ये बॅचलर पदवी असणे आवश्यक आहे. एलएलबी पदवीमध्ये उमेदवाराला एकूण किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी त्यांच्या पसंतीच्या महाविद्यालयांमध्ये जागा मिळवण्यासाठी CLAT-PG/AILET/DU LLM/ MHCET कायदा/LSATसारख्या कोणत्याही एक सामान्य प्रवेश परीक्षेतही पात्र असणे आवश्यक आहे. एसटी/एससी आणि ओबीसीमधील उमेदवारांना अनिवार्य प्रक्रिया म्हणून कोर्स प्रोग्राममध्ये ५ टक्के सूट दिली जाते.

**प्रवेश प्रक्रिया :** कोणत्याही सर्वोच्च विद्यापीठात एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ कोर्समध्ये प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांना प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, एक वैयक्तिक मुलाखत आहे आणि जर उमेदवारांनी त्यात चांगले गुण मिळवले तर त्यांना शिष्यवृत्ती देखील मिळू शकते.

**नोंदणी :** उमेदवार अधिकृत वेबसाइटवर जातात. अधिकृत वेबसाइटला भेट दिल्यानंतर अर्ज भरा. अर्ज भरल्यानंतर तो नीट तपासून घ्या, जर फॉर्ममध्ये चूक असेल तर तो नाकारला जाऊ शकतो. विनंती केलेली कागदपत्रे अपलोड करा. अर्ज सादर करा. क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्डद्वारे ऑनलाइन फॉर्म फी भरा.

**टप्पा २ : प्रवेश परीक्षा :** जर उमेदवारांनी एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ मध्ये प्रवेश घेण्यासाठी उच्च विद्यापीठांचे लक्ष्य ठेवले असेल, तर त्यांच्यासाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे खूप महत्त्वाचे आहे. ज्यासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशपत्र जारी केले जातात. ज्यामध्ये प्रवेश परीक्षेशी संबंधित सर्व माहिती दिली जाते जसे की परीक्षा कधी आणि कुठे होणार आहे, इत्यादी. एलएलएम बिझनेस लॉची प्रवेश प्रक्रिया CLAT-PG/AILET/ DU LLM/MHCET Law/LSAT इत्यादी प्रवेश परीक्षेवर अवलंबून असते. पात्र उमेदवारांची पुढील मुलाखतीच्या आधारे निवड केली जाते. प्रवेश परीक्षा झाल्यानंतर काही दिवसांनी, त्याचा निकाल जाहीर केला जातो, त्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या वेबसाइट्स आणि सोशल मीडिया हँडलची नियमितपणे तपासणी करून स्वतःला अपडेट ठेवले पाहिजे. जे विद्यार्थी प्रवेश परीक्षेत पात्र ठरतील त्यांना विद्यापीठातर्फे मुलाखतीसाठी हजर राहण्यास सांगितले जाईल - एकतर ऑनलाइन (स्काईप, गुगल मीट, झूम) किंवा ऑफलाइन विद्यार्थ्यांना विद्यापीठ कॅम्पसमध्ये बोलावून. दरम्यान, इतर सर्व पात्रता निकषांची तपासणी केली जाते आणि जर विद्यार्थ्यांनी मुलाखतीत चांगली कामगिरी केली तर त्यांना एन्व्हायरमेंटल कायद्यातील एलएलएमचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश दिला जातो.

**अभ्यासक्रम**

- मॉड्यूल I निसर्ग आणि पर्यावरण कायद्याची व्याप्ती
- मॉड्यूल II आंतरराष्ट्रीय कायदा आणि पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल III भारतातील पर्यावरण कायद्याचा इतिहास व विकास
- मॉड्यूल IV भारतीय संविधान अंतर्गत पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल V पर्यावरण संरक्षण, सामान्य नागरी, फौजदारी कायदा
- मॉड्यूल VI भारतातील पाणी, हवा आणि पर्यावरणाचे संरक्षण
- मॉड्यूल VII वन, वन्यजीव आणि जैवविविधतेचे संरक्षण
- मॉड्यूल VIII पर्यावरण कायद्यातील उदयोन्मुख समस्या

**शीर्ष महाविद्यालये**

- तामिळनाडू डॉ. आंबेडकर लॉ युनिव्हर्सिटी, तामिळनाडू
- हिदायतुल्ला राष्ट्रीय कायदा विद्यापीठ, रायपूर
- राष्ट्रीय कायदा विद्यापीठ आणि न्यायिक अकादमी, आसाम
- टेरी युनिव्हर्सिटी, नवी दिल्ली

## वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



## चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**





**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर :** लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

## घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

## 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात अँण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.

ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.



## अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा; असे ठेवा नियंत्रण

**दररोज पुढे जाण्याच्या शर्यतीत प्रत्येक व्यक्ती धकाधकीचं आयुष्य जगत आहे. लवकर पुढे जात लवकर यश मिळवण्याच्या नादात अनेक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. सोपं, लवकर आणि जिभेच्या चवी पुरवण्यासाठी अनेक जण फास्ट फूडच्या आहारी गेले आहेत. या फास्ट फूडमुळेच अनेक जण लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. अशाप्रकारे आलेला लठ्ठपणा कमी करणं तितकंसं सोपं नाही. लठ्ठपणामुळेच शरीरात अनेक प्रकारचे विकार बळावतात. अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा असून शरीरातील लठ्ठपणामुळेच अनेक आजारांना निमंत्रण दिले जाते.**



**लठ्ठपणाचे** निदान व्यक्तीच्या शारीरिक तपासणी आणि त्याच्या इतिहासावर अवलंबून आहे.

लठ्ठपणामुळे आलेल्या रोगांची शक्यता तपासण्यासाठी व्यक्तीच्या 'बीएमआय' बॉडी मास इंडेक्सचे मापन केले जाते. आई-वडिलांपैकी एकाला लठ्ठपणा असल्यास मुलांमध्येही लठ्ठपणा होण्याची शक्यता असते. कॅलरीयुक्त आहार, जंक, फास्ट फूड, पेय पदार्थांचे अधिक सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते. फळं, भाज्या यांच्या कमी सेवनानेही व्यक्ती लठ्ठपणाचा शिकार होऊ शकतात. लठ्ठपणामुळे स्ट्रोक, कॅन्सर, प्रजनन क्षमता कमी होणे, ऑस्ट्रियोआर्थराइटिस, टाइप २ डायबिटीज, पित्ताशयाचे आजार, उच्च रक्तदाब, लिवरला सूज येणे, श्वास घेण्यास अडथळा, नर्व डिस्ऑर्डर यासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

यासारखे आजार बळावू नये यासाठी नियमित व्यायामाने वजन नियंत्रणात ठेवू शकता. जोरात चालणे, पोहणे, सायकल चालवणे यासारखे व्यायाम करू शकता. दिवसांतून तीन वेळा नियमित आहार घ्या. काही लोक भूक लागण्यावर कोणत्याही वेळी खातात. वेळ न पाहता गोड पदार्थ आणि फास्ट फूड खातात. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागतो. कमी कॅलरीयुक्त आहार, फळं, भाज्या, कडधान्यांचे सेवन करा. मिठाई, अल्कोहलचे सेवन अगदी कमी प्रमाणात करा. अतिरिक्त चरबी वाढवणारे पदार्थ खाण्यापासून लांब राहा.

## कच्च्या केळ्याचे सेवन अनेक विकारांवर उपयुक्त

**पिकलेली** केळी आपल्या आहारामध्ये नेहमीच समाविष्ट असून, या फळाचे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने असणारे फायदे आपल्या परिचयाचे आहेत. पोटॅशियम आणि क्षार मुबलक असणारे हे फळ पचण्यास हलके आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये त्वरित ऊर्जा उत्पन्न होत असते. म्हणूनच व्यायामापूर्वी एखादे केळे खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देत असतात. पिकलेल्या केळ्यांप्रमाणे कच्चे केळे देखील भाजी, भजी, कोफ्ते इत्यादी पदार्थ बनवण्याकरिता वापरले जात असते. पिकलेल्या केळ्यांप्रमाणेच कच्च्या केळ्याचे सेवनही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय फायदेशीर म्हटले जाते. कच्च्या केळ्यांमध्ये फायबर आणि हेल्दी स्टार्च असून, ही तत्त्वे आतड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे 'ब्लॉकिज' उत्पन्न होऊ देत नाहीत. त्याचमुळे ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास आहे, त्यांनी कच्च्या केळ्यांचा समावेश आहारामध्ये अवश्य करावा. ज्यांना मधुमेह आहे, किंवा ज्यांना मधुमेह असल्याचे नुकतेच निदान झाले आहे, त्यांच्यासाठी कच्च्या केळ्याचे सेवन फायदेशीर आहे. याच्या सेवनाने शरीरातील ब्लड-शुगरची पातळी नियंत्रणात राहते. कच्च्या केळ्यामध्ये फायबरची मात्रा मुबलक असून, याच्या सेवनाने पोट अधिक काळ भरलेले राहते व त्यामुळे वारंवार भूक लागण्याची भावना होत नाही. याच्या सेवनाने पचनक्रियाही उत्तम राहते. त्यामुळे ज्यांना वारंवार अपचनाचा त्रास होतो, त्यांनी आपल्या आहारामध्ये कच्च्या केळ्याचा समावेश अवश्य करावा.



## भिवंडीतील वाहतूक समस्या निराकरणासाठी आढावा बैठक

भिवंडी महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार शहरात रस्तारुंदीकरण होत नसल्याने आणि पार्किंगच्या जागेची सोय उपलब्ध नसल्याने शहरातील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यावर उपाययोजना करण्यासाठी वाहतूक पोलीस विभाग आणि महापालिका अधिकारी यांच्या कृती समितीची पालिका कार्यालयात बैठक संपन्न झाली होती. दरम्यान, बुधवारी २८ मे रोजी झालेल्या या बैठकीमध्ये शहरातील अनधिकृत व विनापरवाना रिक्षांवर परिवहन विभागामार्फत सुरू असलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला. महानगरपालिका, पोलीस विभाग आणि परिवहन विभाग यांनी एकत्रित पाहणी करून शहरामध्ये नो पार्किंग, दिशादर्शक फलक लावण्याबाबत चर्चा करण्यात आली. शहरामध्ये शासनाकडून सीसीटीव्ही बसविण्याचे काम सुरू असून ते एक महिन्यामध्ये पूर्ण होणार असल्याबाबत पोलीस विभागाने स्पष्ट केले. एसटी महामंडळाने भिवंडी बस स्थानकामध्ये रिक्षा पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी महूसल विभाग, पोलीस विभाग यांचेसोबत महानगरपालिका अधिकाऱ्यांनी समन्वय साधून कारवाई करावी, जेणेकरून त्या भागात कोणत्याही प्रकारे वाहतूककोंडी होणार नाही, याबाबत काळजी घेण्याचे आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

## भिवंडी-ठाणे बायपास रस्त्यावर वाहतुकीचा खोळंबा
# रस्त्यावर खोदकामाचे दगड आल्याने वाहतूककोंडी

**■भिवंडी :** मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी-ठाणे बायपास रस्त्यावरील आठपदरी काँक्रीट रस्ता बनवण्याचे काम कासवगतीने सुरू असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत असल्याचे चित्र दररोज पहावयास मिळत आहे. या वाहतूककोंडीत वाहनचालक, प्रवासी आणि चाकरमान्यांना दररोज अडचणींना सामना करावा लागत आहे. गुरुवारी सकाळी मानकोली ते पिंपळास या दरम्यान ओवळी खिंड येथे मोठागाव मानकोलीकडे जाणाऱ्या रस्त्यातलगत मुख्य रस्त्यावर डोंगराचे खोदकाम सुरू असलेल्या ठिकाणी दगड कोसळत असल्याने या मार्गावर ४ ते ५ किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्याने प्रचंड वाहतूककोंडीचा सामना वाहनचालकांसह प्रवाशांना करावा लागत आहे.



ओवळी खिंड येथे मोठागाव-डोंबिवलीकडे रस्ता जाण्याच्या ठिकाणी मुख्य रस्त्यावरील डोंगर फोडण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील वाहतुकीचा खोळंबा होत आहे. ठेकेदारासह पोलिसांना रस्त्यातील ढिगारा जेसीबीच्या सहाय्याने बाजूला करून वाहनांना वाट मोकळी करून द्यावी लागत आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांना देखील कसरत करावी लागत आहे.

मानकोली ते खारीगाव टोलनाका दरम्यान मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत असून या मार्गावरील वाहतूक दररोज अत्यंत धीम्या गतीने सुरू असल्याने त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होत आहे.

## पावसाळ्यापूर्वी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सज्ज



**कोणाला वाटप केले?**
- केळवे सागरी पोलीस स्टेशन-१
- सातपाटी सागरी पोलीस स्टेशन-१
- वाणगाव सागरी पोलीस स्टेशन-१
- डहाणू सागरी पोलीस स्टेशन-१
- घोलवड सागरी पोलीस स्टेशन-१
- तारापूर सागरी पोलीस स्टेशन-१
- पालघर नगरपरिषद-१
- डहाणू नगरपरिषद-१
- जव्हार नगरपरिषद-१
- वाडा नगरपंचायत -१

एकूण - १०

**■विरार :** जिल्हा नियोजन समिती पालघर अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे बळकटीकरण करण्यासाठी १ कोटी ६६ लाख निधी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग विभागास उपलब्ध करुन देण्यात आला. त्याअंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर यांच्यामार्फत जिल्ह्यातील सहा सागरी पोलीस स्टेशन आणि तीन नगरपालिका एक नगरपंचायत अशा दहा ठिकाणी रोबोटिक बोटींचे वाटप जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर यांच्यामार्फत करण्यात आले. त्यानंतर केळवे समुद्रकिनारी भरतीच्या वेळी दुपारी २ वाजता प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विवेकानंद कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक केळवा, विजया गोस्वामी, पालघर नगर परिषदेचे अग्निशमन अधिकारी, अदिवाल आणि सर्व सागरी पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी तसेच पालघर, डहाणू, जव्हार नगरपालिकेचे व वाडा नगर पंचायतीचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

**बोट ठरणार संजीवनी**

ही बोट पाण्यात बुडत असलेल्या व्यक्तीला वाचवण्यासाठी एक वरदान आहे. कारण एक माणूस वाचवण्यासाठी आपण दुसरा माणूस पाण्यात उतरवतो. पण आता दुर्सया माणसा ऐवजी ही रोबोटीक बोट पाण्यात जाऊन बुडर्णाया व्यक्तीचा जीव वाचवणार आहे. या बोटीची दोनशे किलोग्राम पर्यंत वजन उचलण्याची क्षमता आहे.

# प्लास्टिकमुक्तीसाठी पालिकेचा कापडी पिशव्यांच्या निर्मितीवर भर

पिशव्या शिवून घेण्यासाठी शहरातील १७ महिला बचत गटांची निवड केली असून त्यांच्या द्वारे या कापडी पिशव्या शिवून घेतल्या जात आहेत सद्यस्थितीत ३० हजार इतक्या कापडी पिशव्या शिवून झाल्या असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

**■वसई :** वसई-विरार शहरातील वाढत्या प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर पालिकेने कापडी पिशव्यांची निर्मिती करण्यावर भर दिला आहे.यासाठी १ लाख कापडी पिशव्या तयार केल्या जाणार असून सद्यस्थितीत ३० हजार कापडी पिशव्या महिला बचत गटाकडून तयार करवून घेतल्या आहेत.याशिवाय उर्वरित पिशव्या तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. वसई- विरार शहरात प्लास्टिक बंदी लागू असतानाही छुप्या मार्गाने शहरात दाखल होत आहे. त्यामुळे शहरा प्लास्टिक पिशव्या वापराचे प्रमाण वाढले आहे. भाजी विक्रेते, फळविक्रेते, दुकानदार, फेरीवाले अशा ठिकाणी प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर सुरूच आहे. दैनंदिन कर्चयात ही त्याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे १ लाख कापडी पिशव्या निर्मितीचा संकल्प केला आहे. यासाठी सुरवातीला ३५ हजार मीटर इतके कापड खरेदी करण्यात आले आहे. पिशव्या शिवून घेण्यासाठी शहरातील



१७ महिला बचत गटांची निवड केली असून त्यांच्या द्वारे या कापडी पिशव्या शिवून घेतल्या जात आहेत सद्यस्थितीत ३० हजार इतक्या कापडी पिशव्या शिवून झाल्या असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

**असा केला जाणार वापर**

या तयार केलेल्या कापडी पिशव्या आहेत. त्या दैनंदिन बाजार विक्रेते आहेत त्यांना वाटप केल्या जातील व जो ग्राहक त्यांच्याकडे जाईल त्यावेळी ती कापडी पिशवी देऊन दहा रुपये घ्यायचे आणि पुन्हा तोच ग्राहक पुन्हा त्या विक्रेत्याकडे खरेदीसाठी गेला आणि प्लास्टिक पिशवी सोबत नेली तर त्या ग्राहकाला दहा रुपये परत केले जातील. यामुळे प्लास्टिक पिशवी वापराला निर्बंध लागून कापडी पिशवी वापरण्याची सवय निर्माण होईल असे महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले आहे.

## तर पैसा, इच्छा असूनही कार खरेदी करता येणार नाही, कारण...
# महाराष्ट्र सरकार मोठ्या निर्णयाच्या तयारीत

**■मुंबई :** मुंबई, पुणे यासारख्या महानगरांमध्ये पार्किंगची व्यवस्था ही अडचणीची ठरत आहे. शहरांची व्याप्ती वाढत असताना कमी जागेच्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळं शहरांमध्ये पार्किंगचा वाद हा काही कालांतराने डोके वर काढत असतो. पार्किंगची ही समस्या असतानाच एक महत्त्वपूर्ण अहवाल समोर आला आहे. या अहवालानुसार मुंबईसह राज्यातील रस्त्यांवर प्रति चौरस किमीनुसार बिजिंग, शांघाय आणि टोकिया या जागतिक महानगरांपेक्षाही जास्त वाहने धावताहेत. यावर उपाय म्हणून शासनाने एक धोरण तयार केल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, चेन्नईने एक पार्किंग धोरण आणले आहे, ज्यामध्ये नवीन वाहन नोंदणीसाठी पार्किंग प्रूफ अनिवार्य करण्याची शिफारस केली आहे. खासगी वाहनांचा वापर रोखण्याच्या उद्देशाने, या योजनेत पार्किंग व्यवस्थापन युनिट, नियुक्त क्षेत्रे आणि परिवर्तनीय शुल्क समाविष्ट आहेत. हा उपक्रम जबाबदार कार मालकीला प्रोत्साहन देतो आणि शहरी राहणीमान सुधारण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देतो. मुंबईतील वाहतूक कोंडी आणि प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी कोस्टल रोड अलीकडेच खुला करण्यात आला आहे. याशिवाय, सरकार मेट्रोच्या विस्तारावर लक्ष केंद्रित करत आहे. काल, केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी जलवाहतूक वाढवण्याचा सल्ला दिला होता.




राज्यात वाहन पार्किंगची मोठे डोकेदुखी निर्माण झाली आहे. त्यावर उपाय म्हणून शासनाने एकात्मिक पार्किंग धोरण तयार केले आहे. या धोरणानुसार पार्किंगसाठी जागा असेल, तरच कार खरेदी करता येणार आहे. हे धोरण आता तयार झाले असून, त्याचे सादरीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमात करण्यात आले आहे.

मुंबईत प्रति चौरस किमी ८,५०८ वाहने (कार २,५१२) आहेत. वाहनांचा आकडा बीजिंगमध्ये ३८९, शांघायमध्ये ८४९ आणि टोकियोमध्ये १,८०० एवढा आहे. या आकडेवारीमुळे त्यामुळे मोठी लोकसंख्या असलेल्या जागतिक शहरांच्या तुलनेत मुंबईतील वाहनसंख्या खूपच जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्राची वाहन घनताही प्रति चौरस किमी १२९३ वाहने एवढी आहे.

वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतूक कोंडीसह वायुप्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी परिवहन विभागाने हे पार्किंग धोरण तयार केले. नव्या पार्किंग धोरणाच्या निमित्ताने समोर आलेली ही आकडेवारी गंभीर असून याबाबत राज्य सरकारला तातडीने उपाययोजना कराव्या लागणार असल्याचे मत आता तज्ज्ञांमध्ये व्यक्त होत आहे.

## रायगडमध्ये कोसळलेल्या पावसात ढगफुटीमुळे मुरुडकर धास्तावले, घरांमध्ये पाणी, शेतीचे नुकसान अन् बरंच काही

**■अलिबाग :** सोमवारी रायगडमध्ये कोसळलेल्या पावसात जिल्ह्याची प्रचंड वाताहात झाली. यात सर्वाधिक पाऊस मुरुड तालुक्यात झाला. या पावसात मुरुडकरांचे अतोनात नुकसान झाले असून सोमवारच्या (२६ मे) पावसाच्या आठवणीनेही मुरुडकर धास्तावले आहेत. मुरुडची स्थिती आता पूर्ववत होत असून नुकसानीच्या पंचनाम्यांना सुरुवात झाली आहे.

मुरुड तालुक्यात जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे ३७१ मिमी पाऊस कोसळला होता. यात दत्तमंदिराजवळील डोंगराला भगदाड पडून अनेकांच्या घरात पाणी घुसले होते. एसटी डेपो आणि परिसरातील गटारे रस्त्यावरून वाहात होती. तर रस्त्यावरही गुडघ्यापर्यंत पाणी साठल्याने लोकांची घाबरगुंडी उडाली होती. धोधो कोसळणारा पाऊस आणि भरतीची वेळ यामुळे नद्या उलटल्या. परिणामी मुरुडसह लक्ष्मीखार, उंडरगाव, शिघ्रे येथील अनेक घरांमध्ये पाणी शिरून लोकांचे प्रचंड नुकसान झाले.

ऐन मे महिन्यात कोसळलेल्या पावसामुळे आटलेल्या विहिरी,



नदी-नाले अचानक भरून वाहू लागले. तेलवडे येथे मातीचे घर कोसळले तर उंडरगावात ४-५ घरांमध्ये पाणी घुसून त्यांचे नुकसान झाले. आगरदांडा येथील बौद्ध स्मशानभूमीची भिंतदेखील कोसळली. तसेच मिठागर येथे डोंगराची माती खचल्याने चंद्रकांत ठाकूर यांच्या पोल्ट्रीचे मोठे नुकसान झाले. लक्ष्मीखारच्या ग्रामस्थांना दरवर्षीप्रमाणे यंदाही पूर्व मान्सूनचा तडाखा बसला. सोमवारी साखील ६ वाजताच अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने ग्रामस्थ चिंतेत होते. यावर डोंगरातून वाहत असलेल्या सतीची नदीच्या प्रवाहातील गाळ काढल्यास हा त्रास कायमचा संपेल, असे आगरी समाज अध्यक्ष प्रविण बैकर यांनी सांगितले. या कामासाठी मुरुड नगरपरिषदेने ८ कोटींचा निधीही मंजूर केला असल्याची माहितीही त्यांनी दिली.

शिघ्रे गावात सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे मोरीचे काम सुरु होते. या कामामुळे गटाराचे पाणी अडून अंदाजे ६० घरांमध्ये पाणी शिरुन त्यांचे नुकसान झाल्याची माहिती मुरुड मंडळ अधिकारी कचरे यांनी दिली. मुरुड शहरातील विहिरी मे महिन्यात भरण्याची घटना 60 वर्षांत प्रथमच अनुभवल्याचे गणेश पाखाडीतील ज्येष्ठ नागरिक सुरेश वर्तक यांनी सांगितले.

# जिल्ह्यात अलिबागमध्ये धोकादायक इमारतींमध्ये सरकारी इमारती किती



**अन्यथा कायद्याचा बडगा**

"शहरातील ३९ धोकादायक इमारती आणि घरमालकांना दहा दिवसांपूर्वी नगरपरिषदेने नोटिसा बजावल्या होत्या. आता पुन्हा त्यांना समज देण्यात येणार आहे. त्यानंतरही इमारतीचे काम न केल्यास किंवा धोकादायक इमारत रिकामी न केल्यास त्यांच्यावर थेट कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे."

-सचिन बच्छाव, मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद

**■अलिबाग :** रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या आणि प्रशासनाचे हेडक्वॉर्टर असलेल्या अलिबागमध्ये तब्बल ३९ इमारती धोकादायक असल्याचे समोर आले आहे. गंभीर बाब म्हणजे यातील ४ इमारती सरकारी आहेत. अलिबाग नगरपरिषदेने या सर्व धोकादायक इमारतींना पुन्हा नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे.

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील ३९ इमारती धोकादायक आहेत. त्यातील १४ इमारती धोकादायक आणि २५ इमारती अतिधोकादायक आहेत. धोकादायक इमारतींपैकी १३ खासगी आणि एक सरकारी इमारत आहे. अतिधोकादायक इमारतीमध्ये २२ खासगी व तीन शासकीय इमारतींचा समावेश आहे. अलिबाग नगरपरिषदेने सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना नोटीस देण्याचे काम सुरू केले आहे.

रायगड जिल्ह्यात काही वर्षांत इमारती तसेच दरड कोसळण्याच्या अनेक मोठ्या दुर्घटना घडल्या आहेत. त्यामुळे धोकादायक इमारतींमुळे सर्वांची चिंता वाढत आहे. वादळवाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसात तसेच अतिवृष्टीत धोकादायक इमारतींची पडझड होण्याची किंवा त्या कोसळण्याची भीती असते. हे लक्षात घेऊ अलिबाग नगरपरिषदेने सर्वेक्षण करून धोकादायक इमारतींची माहिती घेतली. यात 14 इमारती धोकादायक आणि २५ इमारती अतिधोकादायक असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अलिबागमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाची इमारत धोकादायक आहे. या ठिकाणी नवीन इमारत उभारण्याच्या हालचाली झाल्या होत्या. त्यामुळे सध्या राज्य उत्पादन शुल्क विभाग गोंधळपाडा येथील एका जागेत कार्यरत आहे.

**कर्मचाऱ्यांनो जीवाला सांभाळा**

जिल्हा टपाल कार्यालयाच्या मागील जागेत कर्मचारी वसाहतीची ४० वर्षे जुनी इमारत आता जीर्ण होऊन मोडकळीस आली आहे. परंतु सरकारकडून नवीन इमारत बांधकामासाठी कोणतीही हालचाल नसल्याची माहिती मिळत आहे. अलिबागमधील तलाठी कार्यालयाच्या मागील बाजूस कर्मचारी वसाहत आहे. ही इमारतदेखील जीर्ण झाली आहे. तसेच जिल्हा परिषदेची प्रशासकीय इमारत आहे.

या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधण्याची हालचाल सुरू आहे. त्यामुळे सध्या जिल्हा परिषदेचा कारभार कुंटेबाग येथून चालत आहे. जीर्ण झालेल्या इमारतीच्या जागी नवीन सात मजली इमारत बांधली जाणार असल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. परंतु, त्याला कधी मुहूर्त कधी लागणार असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित केला जात आहे.

# केळवा येथील रिसॉर्टमध्ये गोळीबार

**■बोईसर :** पालघरमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. केळवेमध्ये एका अल्पवयीन मुलीला गावठी कट्ट्यातून गोळी लागल्याचा प्रकार (ता.३०)घडला आहे. ती मुलगी आपल्या प्रियकरासह रिसॉर्टवर आली होती. त्याच्या बॅगेत गावठी कट्टा सापडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पालघरच्या केळवे या पर्यटनस्थळी शुक्रवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली. एक १७ वर्षी मुलगी ही आपल्या प्रियकरासोबत केळवे येथील एका खासगी रिसॉर्टवर गेली होती. रुममध्ये गेल्यानंतर तिचा प्रियकर हा वॉशरूममध्ये गेला होता. प्रियकर वॉशरुमला गेल्यानंतर या मुलीने त्याची बॅग तपासून पाहिली. मात्र बॅगेमध्ये तिला विनापरवाना असलेला गावठी कट्टा सापडला. गावठी कट्टा तिने बाहेर काढला आणि त्याची पाहणी करत होती. नेमके त्यावेळी या मुलीकडून चुकून ट्रिगर दाबला गेला अन गोळी सुटली. सुदैवाने ही गोळी मुलीच्या मानेला लागून गेली. या दुर्घटनेत तरुणी गंभीर जखमी झाली.

दरम्यान, या मुलीच्या प्रियकराला पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणात पालघर पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू आहे. मात्र या घटनेमुळे पालघरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. मागील आठवड्यात याच केळवे पर्यटनस्थळी एका विवाहित महिलेचा संशयास्पद मृत्यू झाला होता. त्यामुळे येथील रिसॉर्ट आणि हॉटेल चालक आपल्या रिसॉर्टमध्ये रूम्स देताना योग्य ती कागदपत्रांची पडताळणी करत नसल्याने असे प्रकार वाढत असल्याचे आता सांगितले जातेय.

**केळवे येथील गैरप्रकारांना पुष्टी**

काही दिवसांपूर्वी घडलेल्या तरुणीच्या मृत्यूप्रसंगी मयत व्यक्ती भात खात असताना चिकनचा तुकडा घशात अडकल्याने गुदमरून मृत्यू झाल्याने सारवा सारव करण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. पालघर येथे नव्याने दाखल झालेले पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी जिल्ह्यामध्ये कोणताही गैरप्रकार सुरू राहणार नाही, यासंदर्भात सर्व पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी यांना तंबी दिली होती. मात्र ते रुजू झाल्यानंतर आठवड्याभरातच ही घटना घडल्याने आगामी काळात पोलिसांकडून केळवा व इतर पर्यटन ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ठोस उपाययोजना केल्या जातील अशी शक्यता आहे. या संदर्भात केळवा पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी भ्रमणध्वनी वरून प्रतिसाद दिला नाही. मात्र पालघर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस अधिकारी अनंत पराड यांनी या घटनेला दुजोरा दिला असून गंभीर असर्णाया तरुणीला बोईसर येथे पुढे पाठवण्यात आल्याची माहिती दिली.

## हनीट्रॅपच्या जाळ्यात अडकला ठाण्याचा अभियंता
# युद्धनौकांची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवली

**■ठाणे :** 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर भारतात राहून पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्यांची शोधमोहीम तपास यंत्रणेद्वारे सुरू आहे. याच मालिकेत, हरियाणातील युट्यूबर ज्योती मल्होत्रासह काही जणांना अटक केल्यानंतर, आता महाराष्ट्रातही एक मोठी कारवाई करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील कळवा परिसरातून एका २७ वर्षीय अभियंत्यास अटक करण्यात आली असून त्याच्यावर नौदलाच्या युद्धनौका आणि पाणबुड्यांबाबत संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवण्याचा गंभीर आरोप आहे.

**डॉकयार्डमध्ये प्रवेश असलेला अभियंता हनीट्रॅपमध्ये अडकला**

महाराष्ट्र आतंकवादविरोधी पथकाने अटक केलेल्या तरुणाचे नाव रवींद्र मुरलीधर वर्मा असे असून तो ठाण्यातील कळवा परिसरात राहतो. वर्मा संरक्षण तंत्रज्ञानाशी संबंधित प्रकल्पांवर काम करणाऱ्या एका खाजगी कंपनीत कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत होता. या कंपनीच्या माध्यमातून त्याला दक्षिण मुंबईतील नौदल डॉकयार्डमध्ये नियमितपणे प्रवेश मिळत असे. त्यामुळे तो नौदलाच्या जहाजांवर प्रत्यक्ष काम करत होता आणि त्यादरम्यान त्याला संवेदनशील तांत्रिक माहिती मिळत होती.



**फेसबुकवरून पाकिस्तानी महिला एजंटशी संपर्क**

अळर ने दिलेल्या महितीनुसार, फेसबुकवर 'पायल शर्मा' आणि 'इस्प्रित' या नावाने स्वतःची ओळख सांगणाऱ्या पाकिस्तानी महिला एजंटशी वमार्ची ओळख झाली होती. काही काळातच तिच्यासोबत त्याचे मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. मात्र ही महिला प्रत्यक्षात पाकिस्तानी गुप्तचर संस्थेशी संबंधित एजंट असल्याचे पुढे आले. या हनीट्रॅपमध्ये अडकून वमार्ने नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत तिच्यासोबत संवाद साधला. या संवादात, एजंटने वर्माकडे युद्धनौका आणि पाणबुड्यांबाबत माहिती मागितली. डॉकयार्डमध्ये मोबाईल नेण्यास बंदी असल्यामुळे वर्मा तांत्रिक माहिती लक्षात ठेवून, नंतर ती व्हॉट्सअॅपद्वारे मजकूर आणि व्हॉइस नोट्सच्या स्वरूपात पाठवत असे. त्याने एकूण १४ युद्धनौकांबाबत संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवली, असा दावा तपास यंत्रणांनी केला आहे.

**एटीएसची कारवाई, कायदेशीर प्रक्रिया सुरू**

गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, महाराष्ट्र एटीएसने ही कारवाई केली. वमासोबत संपर्कात असलेल्या आणखी दोन जणांना ताब्यात घेण्यात आले होते, मात्र चौकशीनंतर त्यांना सोडण्यात आले. रवींद्र वर्मावर अधिकृत गोपनीयता कायदा १९२३ च्या कलम ३(१)(ब) आणि ५(अ), तसेच भारतीय दंड संहिता २०२३ च्या कलम ६१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपासासाठी अळर कोठडीत ठेवण्यात आले आहे. एटीएस त्याच्या मोबाईल फोन आणि इतर उपकरणांची तपासणी करत आहे, तर या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचा शोध घेण्याचे कामही सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com